३५

" मातंग मुक्ती सेना "-२०११
वार्षिक लेखा परिक्षण लेखे व आयकर विवरण सादर न केल्यामुळे या पक्षाची नोंदणी रद्द करण्याबाबत .

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.३८/का.११,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८.०८.२०१६

## आ दे श

राज्यामध्ये लोकशाहीचे बळकटीकरण व्हावे व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाद्वारे निवडणूक लढविण्यावर भर देण्यात यावा या उद्देशाने राज्य निवडणूक आयोगाने "महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्ह वाटप आदेश" २००४ व क्रमांक-एसईसी/२००९/सीआर-४९/का.११, दि. ३१/०३/२००९ आदेश पारित केले आहेत.

२. या अधिसूचनेनुसार " कोणतीही संस्था किंवा राजकीय पक्ष म्हणून स्वत:स म्हणवून घेणाऱ्या व्यक्तीची संस्था किंवा भारत निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच नोंदणी झालेला राजकीय पक्ष " राज्य निवडणूक आयोगाकडे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रयोजनाकरिता राजकीय पक्ष म्हणून नोंदणीसाठी अर्ज करु शकतो. सदर संस्था किंवा पक्ष यांनी सर्व बाबींची पूर्तता केल्यावर राज्य निवडणूक आयोगाकडून राजकीय पक्ष म्हणून त्यांची नोंदणी करण्यात येते.

३. या अधिसूचनेतील तरतुदीनुसार प्रत्येक नोंदणीकृत राजकीय पक्षाने "वार्षिक लेखा परिक्षण लेख्याची" एक प्रत व संबंधित कायद्यान्वये भरलेल्या "वार्षिक आयकर विवरणपत्राची" एक प्रत संबंधित वित्तीय वर्ष संपल्यानंतर एक वर्षाच्या आत आयोगाच्या कार्यालयास देण्याची तसेच आदर्श आचारसंहिता व आयोगाचे निर्देश व सूचनांचे पालन करण्याची तरतूद आहे. जर एखाद्या राजकीय पक्षाने आदर्श आचारसंहितेचे व आयोगाच्या सूचनांचे पालन केले नाही तर त्यांची नोंदणी रद्दबातल ठरवून त्यांना नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या यादीतून काढून टाकण्याचीदेखील तरतूद आहे.

४.	**" मातंग मुक्ती सेना "** या पक्षाची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्रमांक-रानिआ/रापनों-२०११/प्र.क्र.२४/का.११, दि. ०१.११.२०११ अन्वये करण्यात आलेली आहे. या नोंदणीकृत पक्षाने खाली दर्शविल्याप्रमाणे आवश्यक असलेले "वार्षिक लेखा परिक्षण लेख्याची" प्रत व "वार्षिक आयकर विवरणपत्राची" प्रत सादर केलेली नाही.

| **प्राप्त न झालेली कागदपत्रांचे वर्ष** | |
|---|---|
| **लेखा परिक्षित लेख्याची प्रत** | **आयकर विवरणाची प्रत** |
| निरंक | २०११-२०१२ ते २०१२-२०१३ |

५.	उपरोक्त कागदपत्रे सादर न केल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाकडून सदर पक्षाला आदेश क्र.रापनों-२०१५/प्र.क्र.२१/का.११, दि.१७.११.२०१५ द्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे दि. ३० डिसेंबर, २०१५ पर्यंत सर्व कागदपत्रे सादर करण्याविषयी अंतिम नोटीस बजावण्यात आली :

> *" या कागदपत्रांची पूर्तता आपणाकडून वरील मुदतीत न झाल्यास किंवा आपणाकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यास आपल्या पक्षाची नोंदणी रद्द करण्यात येईल. "*

सदर पक्षास नोटीस मिळाल्याबाबतची पोचपावती उपलब्ध आहे. तसेच प्रमुख वर्तमानपत्रामध्ये या आशयाचे प्रसिध्दीपत्रक दि. २३.११.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आले.

**" मातंग मुक्ती सेना "** यांनी वरील नोटीस व प्रसिध्दी पत्रकाला प्रतिसाद म्हणून दि. ३०.१२.२०१५ च्या पत्रान्वये काही कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच उर्वरित कागदपत्रांसाठी मुदतवाढीची मागणी केली आहे. सदर पक्षाला या कार्यालयाच्या दि.११.०३.२०१६ च्या पत्रान्वये उर्वरित कागदपत्रे सादर करण्यासाठी दि. १५.०४.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, सदर पक्षाने अद्यापही संपूर्ण कागदपत्रे आयोगास सादर केलेली नाहीत.

६.     ज्याअर्थी, **" मातंग मुक्ती सेना "** यांची राजकीय पक्ष म्हणून २०११ मध्ये नोंदणी झालेली होती व ज्याअर्थी या पक्षाने अधिसूचनेतील तरतुदीनुसार दरवर्षी आयोगाच्या कार्यालयास "वार्षिक लेखा परिक्षण लेख्याची" प्रत व "वार्षिक आयकर विवरणपत्राची" प्रत सादर केली नाही व ज्याअर्थी, या पक्षाला २०१५ मध्ये अंतिम नोटीस देऊन तसेच दि. १५.०४.२०१६ पर्यंत मुदतवाढ देऊनही सदर पक्षाने विहित कागदपत्रे आयोगास सादर केली नाहीत. त्याअर्थी, सदर पक्षाची नोंदणी पुढे चालू ठेवण्याचे काहीही प्रयोजन दिसून येत नाही. म्हणून वरील सर्व बाबींचा विचार करुन **" मातंग मुक्ती सेना "** या पक्षाची राजकीय पक्ष म्हणून केलेली नोंदणी या आदेशाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

24/8/2016

( डॉ. प्रदीप व्यास)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
मातंग मुक्ती सेना
मु.पो.खाडगाव, लातूर,
ता. जि. लातूर